आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१७ सप्टेंबर २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ओदिशात 'सुभद्रा' योजनेचा प्रारंभ करणार / दहा लाखापेक्षा जास्त महिलांच्या खात्यात जमा करणार मदतीचा पहिला हप्ता
- मणिपूरमध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी केंद्र सरकारनं आराखडा तयार केला असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- 'स्वच्छता ही सेवा' अभियानाला आजपासून देशभरात सुरुवात
- मराठवाडा मुक्तीदिन महाराष्ट्र आणि तेलंगणात साजरा
- महाराष्ट्रासह देशभरात आज गणेशोत्सवाचा समारोप / विसर्जनाच्या मिरवणुका सुरु

  **आणि**

- ४५ व्या बुद्धिबळ ऑलिंपियाडमधे भारताच्या संघाची आगेकूच

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ओदिशात भुवनेश्वर इथं ओदिशा राज्य सरकारच्या 'सुभद्रा' या महत्वाकांक्षी योजनेचा प्रारंभ करणार आहेत. या योजनेअंतर्गत राज्यभरातल्या २१ ते ६० वयोगटातल्या पात्र लाभार्थी महिलांना, पाच वर्षांत ५० हजाराचं आर्थिक सहाय्य दिलं जाणार आहे. या अंतर्गत वर्षभरात दोन हप्त्यांमध्ये १० हजार रुपये खात्यात जमा केले जाणार आहेत. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते १० लाखापेक्षा जास्त लाभार्थी महिलांच्या खात्यात पहिला हफ्ता जमा केला जाईल, तसंच ते लाभार्थी महिलांशीही संवाद साधणार आहेत.

प्रधानमंत्री २ हजार ८०० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या रेल्वे प्रकल्पांचं भूमिपूजन आणि लोकार्पणही करणार आहेत. यावेळी ते १ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं भूमिपूजनही करणार आहेत.

**<><><><><>**

मणिपूरमध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी केंद्र सरकारनं आराखडा तयार केला असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातल्या तिसऱ्या कार्यकाळात केंद्र सरकारला १०० दिवस पूर्ण झाल्यानिमीत्त त्यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांशी संवाद साधला.

मणिपूरमधला हिंसाचार वांशिक स्वरुपाचा आहे, आणि तो रोखण्यासाठी सरकार कुकी आणि मैतेई या दोन्ही समुदायांसोबत चर्चा करत आहे, असं त्यांनी सांगितलं. तिथली परिस्थिती लवकरच पूर्वपदावर येईल अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

संरक्षण क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. केंद्र सरकारच्या कार्यकाळाचे १०० दिवस पूर्ण झाल्यानिमीत्त ते आज बातमीदारांशी बोलत होते.

**<><><><><>**

देशभरात आजपासून ‘स्वच्छता ही सेवा अभियान २०२४’ ला सुरुवात झाली. येत्या २ ऑक्टोबरपर्यंत हे अभियान सुरू असेल. स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता ही यंदाच्या अभियानाची संकल्पना आहे. यंदाच्या अभियानासाठी संपूर्ण समाजाचा

सहभाग असावा या दृष्टीने श्रमदान मोहिमा, जन भागिदारी आणि सफाई मित्र ते तीन प्रमुख स्तंभ म्हणून निश्चित केले गेले आहेत. या अभियाना अंतर्गत पर्यटनस्थळं, सार्वजनिक इमारती, व्यापारी क्षेत्र, पाणवठे, प्राणिसंग्रहालयं, अभयारण्ये, सामुदायिक आणि सार्वजनिक स्वच्छतागृह अशा विविध ठिकाणी स्वच्छताविषयक श्रमदान आणि सामूहिक मोहिमा राबवल्या जाणार आहेत.

या अभियानाच्या निमित्तानं आज ठिकठिकाणी स्वच्छताविषयक शपथ ग्रहण कार्यक्रमांचं आयोजन केलं गेलं. याअंतर्गत राज्यात विविध रेल्वे स्थानकं, आकाशवाणीची मुंबईसह इतर प्रादेशिक केंद्र, तसंच केंद्र सरकारच्या अखत्यारितील विविध कार्यालयांमध्ये स्वच्छताविषयक शपथ दिली गेली.

<><><><>

आठव्या भारत जल सप्ताह २०२४ ची सुरुवात आज नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत झाली. आझादी का अमृत महोत्सवाच्या काळात अमृत सरोवरांची निर्मिती करण्यात आली तसंच अनेक जलकुंभांचं पुनरुज्जीवन करण्यात आलं, असं राष्ट्रपतींनी यावेळी सांगितलं. भारतीय धर्मग्रंथात हजारो वर्षांपासून जलसंधारणाचं महत्व सांगितल्याचंही त्या म्हणाल्या.

चार दिवसांच्या या कार्यक्रमात ४० देशातले दोनशे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.  या कार्यक्रमात शंभरहून अधिक दालनं आणि जल क्षेत्रातले स्टार्टअप्स आपल्या संकल्पना मांडणार आहेत.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विश्वकर्मा जयंती निमित्त सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये प्रधानमंत्र्यांनी निर्मिती आणि बांधकाम क्षेत्रातल्या कारागीरांना अभिवादन केलं. विकसित आणि आत्मनिर्भर भारत निर्माण करण्यात त्यांचं योगदान अमूल्य असल्याचं मोदी म्हणाले.

**<><><><><>**

आम आदमी पार्टीच्या नेत्या आतिशी यांची पक्षाच्या विधिमंडळ नेतेपदी आज निवड करण्यात आली आहे. आतिशी या दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री असतील हे आता स्पष्ट झालं आहे. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची दोन दिवसांपूर्वी जामिनावर सुटका झाल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली होती. केजरीवाल आज संध्याकाळी नायब राज्यपाल व्ही के सक्सेना यांना भेटून पदाचा राजीनामा देणार आहेत.

**<><><><><>**

इतर भाषांचा आदर बाळगून हिंदीला प्रोत्साहन देणं गरजेचं असल्याचं प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सहगल यांनी म्हटलं आहे. हिंदी दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी तसंच आकाशवाणीच्या महासंचालक प्रज्ञा पालिवाल यावेळी उपस्थित होत्या.

आकाशवाणी मुंबई केंद्रातही हिंदी दिवस आणि हिंदी पखवाडा प्रारंभानिमित्त विशेष कार्यक्रम झाला.

**<><><><><>**

हैदराबाद मुक्तीसंग्राम दिनानिमित्त आज महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. मराठवाड्यातल्या सर्व जिल्ह्यांत आज हैदराबाद मुक्तीसंग्राम दिन साजरा होत आहे. त्यानिमित्त परभणी इथं पालकमंत्री संजय बनसोडे, हिंगोली इथं पालकमंत्री अब्दुल सत्तार, धाराशिव इथं तानाजी सावंत, जालना इथं अतुल सावे, बीड इथं धनंजय मुंडे, नांदेडमध्ये गिरीश महाजन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.

हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. निजाम आणि रझाकारांच्या अत्याचारांवर मात करत, एकजुटीनं लढलेल्या मराठवाड्यातल्या जनतेच्या संघर्षाचं स्मरण आपण आज करत आहोत, असं शाह यांनी म्हटलं आहे.

तेलंगणामध्येही आज हैदराबाद मुक्तीसंग्राम दिनानिमित्त सिकंदराबाद इथं केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाकडून समारंभ आयोजित करण्यात आला आहे. यावेळी केंद्रीय मंत्री जी. किशन रेड्डी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. राज्य सरकार हा दिवस ‘प्रजा पालन दिनोत्सवम’ म्हणून साजरा करत आहे. हैदराबाद इथं मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. तसंच तेलंगणाच्या सर्व जिल्ह्यात पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.

**<><><><><>**

गणेशचतुर्थी पासून सुरु झालेल्या गणेशोत्सवाची आज सांगता होत आहे. लाडक्या गणरायाला पुढच्या वर्षी येण्याचं आमंत्रण देत वाजत गाजत निरोप देण्यात

येत आहे. महाराष्ट्रात मोठमोठ्या मिरवणुकांचा प्रारंभ झाला आहे. मुंबईच्या गणेशविसर्जन मिरवणुकांची माहिती आमच्या प्रतिनिधी कडून....

**व्हॉईसकास्ट- अंकिता आपटे**

*( विसर्जनस्थळांकडे जाणारे रस्ते गर्दीने फुलून गेले आहेत. ढोल ताशा लेझीम आणि बाजाच्या संगीतावर उत्फुल्लपणे सर्वजण गुलालाची, फुलांची उधळण करीत आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देत आहेत.  लालबागचा राजा, तेजुकाया मॅन्शन, गणेशगल्ली इत्यादी प्रसिद्ध मंडळांच्या महाकाय मूर्ती मिरवणुकीने निघाल्या आहेत. विसर्जन सोहळ्यासाठी मुंबई महापालिकेने जय्यत तयारी केली आहे. महापालिकेचे सुमारे १२ हजार अधिकारी - कर्मचारी विसर्जन स्थळांवर तैनात आहेत. गिरगाव, दादर, जुहू इत्यादी समुद्रकिनाऱ्यांसह ६९ नैसर्गिक स्थळांसह एकूण २०४ कृत्रिम विसर्जनस्थळांवर विसर्जन सुरू झालं आहे.  चौपाटीवर विसर्जनासाठी येणारी वाहनं वाळूमध्ये अडकू नयेत यासाठी किना-यांवर ४७८ स्टील प्लेट टाकण्यात आल्या आहेत. छोट्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी विविध ठिकाणी ४३ जर्मन तराफ्यांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. चौपाट्यांवर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलीस,  ७६१ जीवरक्षकांसह ४८ मोटरबोटी तैनात केल्या आहेत, निर्माल्य गोळा करण्यासाठी १६३ निर्माल्य कलशांसह २७४ निर्माल्य वाहनांचीही सोय करण्यात आली आहे.  १९२ नियंत्रण कक्ष तर सुरक्षेच्या दृष्टीने ६६ निरीक्षण मनोरे उभारण्यात आले आहेत. आरोग्य विभागाकडून ७५ प्रथमोपचार केंद्रांसह ६७ रुग्णवाहिका देखील सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.*

*पुण्यातही कसबा, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग, केसरीवाडा हे मानाचे पाच गणपती विसर्जनासाठी निघाले आहेत. याखेरीज नागपूर, छत्रपती संभाजीनगर,*

*कोल्हापूर इत्यादी प्रमुख शहरांमधे गणेशविसर्जनाला वाजत गाजत प्रारंभ झाला आहे. )*

<><><><><>

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, अमेरिकेतल्या गणेशोत्सवाविषयी.

<><><><><>

कोलकत्यातल्या महिला डॉक्टर बलात्कार आणि हत्येप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात आज पुन्हा सुनावणीला सुरुवात झाली. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या तीन सदस्यीय पीठाने आरोग्य कर्मचाऱ्यांना कामावर हजर राहण्याच्या सूचना ९ सप्टेंबर रोजी दिल्या होत्या. न्यायालयाने सीबीआयकडून तपासाच्या सद्यस्थितीचा आढावाही मागवला आहे.

<><><><><>

उत्तरप्रदेशातल्या फिरोजाबाद जिल्ह्यात एका फटाक्यांच्या गोदामात काल रात्री झालेल्या स्फोटात एका लहान मुलासह पाच जणांचा मृत्यू झाला तर ८ जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

<><><><><>

४५ व्या बुद्धिबळ ऑलिंपियाडमधे भारताच्या पुरुष संघाने हंगेरीविरुद्ध  ३ -१ असा विजय मिळवला आहे. तर महिलांच्या संघाने आर्मिनियावर अडीच विरुद्ध दीड

अशा गुणफरकाने मात केली. बुडापेस्ट मधे चाललेल्या या स्पर्धेत भारताने आघाडी मिळवली आहे. भारताचा ग्रँडमास्टर अर्जुन एरिगसी याने सलग ६ सामने जिंकले तर डी गुकेश आणि आर प्रज्ञानंद यांनी आपापले सामने अनिर्णित राखण्यात यश मिळवलं. विदित गुजराथीने एक सामना जिंकला. महिलांमधे दिव्या देशमुखने आर्मिनियाबरोबरचा सामना जिंकला. डी हारिका आणि आर वैशाली या दोघींचे सामने अनिर्णित राहिले. तर तानिया सचदेवचा सामना बरोबरीत सुटला.

**<><><><><>**

मध्य प्रदेशचा पूर्व भाग, छत्तीसगड, झारखंड आणि उत्तर प्रदेशच्या काही भागात आज जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तसंच, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, अंदमान आणि निकोबार बेटं आणि उत्तराखंडमध्ये पुढच्या दोन ते तीन दिवसात मुसळधार पाऊस होणार आहे. येत्या आठवड्याभरात मध्य प्रदेश, कोकण आणि गोव्यात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.